महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ०२ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०७१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मुंबईला वेठीस धरू नका - उच्च न्यायालय

## मराठा आंदोलनावर आज तीन वाजता पुन्हा सुनावणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई : मनोज जरांगे-पाटील यांनी २९ ऑगस्टपासून मुंबईत सुरू केलेल्या आंदोलनाविरोधात केलेल्या जनहित याचिकेवर आज (दि.१) दुपारी मुंबई उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी झाली. "आंदोलन हाताबाहेर गेले आहे. आम्ही संयम ठेवला कारण काही तरी चांगल व्हावं, अशी आमची इच्छा होती," असे स्पष्ट करत पावसात आंदोलन करताय तर चिखलात बसण्याची तयारी ठेवा, असेही न्यायालयाने सुनावले. तसेच या मुद्यावर उद्या दुपारी तीन वाजता सुनावणी होईल, असे स्पष्ट केले.**

### आम्ही संयम ठेवला - उच्च न्यायालय

मराठा आंदोलनामुळे मुंबईकरांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्याने याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी एमी फाऊंडेशनच्या वतीने दाखल केलेल्या याचिकेमध्ये करण्यात आली होती. याचिककर्त्यांची मागणी मान्य करत न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर तातडीची सुनावणी झाली. आंदोलन हाताबाहेर गेले आहे. आम्ही संयम ठेवला कारण काही तरी चांगल व्हावं, अशी आमची इच्छा होती, असे स्पष्ट करत पावसात आंदोलन करताय तर चिखलात बसण्याची तयारी ठेवा, असेही न्यायालयाने सुनावले. या आंदोलनाचा मुंबईकरांना त्रास होवू नये. उद्या शाळा आणि कॉलेजवरही परिणाम होईल. आम्ही आंदोलनाच्या विरोधात नाही मात्र नियम व अटींचे पालन करा. मुंबईकरांना उगाच त्रास होत कामा नये. २६ ऑगस्टला आम्ही दिलेल्या निर्देशाचे काटेकोर पालन करा, असा आदेश उच्च न्यायालयाने दिला.



काही नियमांचे पालन करण्याच्या शर्थीवर आंदोलनास परवानगी देण्यात आली होती. तिथं कुणीही उघड्यावर घाण करू नये, वाहतुकीस अडथळा आणू नये, पोलिसांनी अटकाव करू नये, सायंकाळी 6 नंतर आंदोलन संपवून जागा रिकामी करावी, अश्या अनेक अटीशर्ती घालूनच केवळ एका दिवसाची परवानगी दिली होती. राज्य सरकारनं या आंदोलनातील मागण्यांचा विचार करण्याकरता एक समिती तयार केलीय. त्या समितीच्या माध्यमातून मागण्यांचा विचारही सुरू आहे. तसेच आंदोलकांशी चर्चादिखील सुरू आहे. हमीपत्र देताना अटींचे पालन केले जाईल, असे आंदोलकांकडून सांगण्यात आले होते. मुंबईत पाच हजार आंदोलकांना परवानगी देण्यात आली होती. मात्र या अटींचे उल्लंघन झाले आहे. हजारो आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत. आंदोलकांनी सध्या मुंबईला खेळाचं मैदान बनवलंय, पोलिसांचे निर्देश पाळले जात नाहीत. संपूर्ण दक्षिण मुंबईत रास्ता रोको केला जातोय, अशी माहिती महाधिवक्त्यांनी दिली. नियमांचे उल्लंघन होत असेल तर तुम्ही नोटीस बजावू शकता. यावेळी आंदोलनावेळी देण्यात आलेल्या हमीपत्रातील अटींचे उल्लंघनाबाबत जरांगे यांना नोटीस बजावली होती का?, आंदोलन रस्त्यावर उतरले तेव्हा तत्काळ कारवाई का केली नाही, अशी विचारणा यावेळी न्यायालयाने केली. गणेशोत्सवात दिवसात कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. आधीच बंदोबस्ताचा ताण असलेल्या पोलीसांवर सध्या प्रचंड दबाव आहे. शनिवार-रविवारच्या आंदोलनासाठी कोणतीही परवानगी दिलेली नव्हती. या प्रश्नी न्यायालयाने निर्णय द्यावा, आम्ही तत्काळ करु, असे महाधिवक्त्यांनी सांगितले.

# अंबरनाथ नगरपरिषदेच्या प्रभाग रचनेवरील हरकती व सूचनांवर सुनावणी

**प्रारूप प्रभाग रचनेबाबत विहित मुदतीत एकूण १०२ हरकती व सूचना प्राप्त**



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपरिषद नगरविकास विभाग यांनी दि.१४/०८/२०२५ रोजी जाहीर केलेल्या नगरपरिषदेच्या प्रभाग रचनेबाबतचे सुधारित वेळापत्रकानुसार दि. १८/०८/२०२५ रोजी अंबरनाथ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक, २०२५ करिता एकूण २९ पॅनल चे प्रारूप प्रभाग रचनेची प्रसिद्धी करण्यात आली होती. सदरील प्रारूप प्रभाग रचनेबाबत दि. १८/०८/२०२५ पासून ते दि. ३१/०८/२०२५ दु. ३वाजे पर्यंत हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी देण्यात आलेला होता. त्या नुसार, प्रारूप प्रभाग रचनेबाबत विहित मुदतीत एकूण १०२ हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्याकरिता, मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.०१/०९/२०२५ ते दि. ०८/०९/२०२५ दरम्यान सुनावणी घेणेकरिता प्राधिकृत केलेले मा. उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर, श्री. विजयानंद स्वानंद शर्मा, यांनी निश्चित केल्याप्रमाणे दिनांक 1 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 11 वाजेपासून सुनावणी प्रक्रिया स्थायी समिती सभागृह, पहिला मजला, अंबरनाथ नगरपरिषद कार्यालय येथे आयोजित करण्यात आला होता. सदरील सुनावणी करिता मा. उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर, मा. मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद इतर आवश्यक अधिकारी कर्मचाऱ्यांसमवेत सकाळी ११ वाजेपासून, सर्व उपस्थितांच्या हरकतींची सुनावणी संपे पर्यंत उपस्थित होते.

# शासनाचा आदेश धाब्यावर !

## शिक्षकांना गणेशोत्सापुर्वी वेतन नाहीच

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** गणेशोत्सवापुर्वी शिक्षकांचा पगार खात्यावर जमा करावा, असे शासकीय आदेश असतानाही गणेशोत्सवाआधी तर नाहीच पण, पाच दिवसांच्या गणपती विसर्जनानंतरही शिक्षकांचे पगार झाले नाहीत. यामुळे शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे. विशेष म्हणजे निवृत्ती वेतन धारकांचे वेतनही अजूनपर्यंत मिळाले नसल्याने त्यांच्याही आनंदावर विरजण पडले आहे. वेतन केव्हा मिळेल, या प्रतिक्षेत शिक्षक आहेत.

२७ ऑगस्टला सुरू झालेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच निवृत्ती वेतनधारकांचा गणेशोत्सव उत्साहात साजरा होण्यासाठी १ सप्टेंबरला होणारा पगार २६ ऑगस्ट, २०२५ ला करण्याबाबतचा शासननिर्णय २१ ऑगस्टला काढण्यात आला होता. राज्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा पगार २६ ऑगस्टला होण्यासाठी वेतन देयके संबंधित कोषागार कार्यालयात सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

मात्र शहापुर पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील जिल्हापरिषदेच्या एक हजार १३९ शिक्षकांचे पगार शासन निर्णयानुसार २६ ऑगस्टला झालेच नाहीत. त्यामुळे शिक्षकांमध्ये नाराजी पसरली असून पुढच्या दोन दिवसात तरी पगार होतील अशी आशा बाळगून असलेल्या शिक्षकांचा पाच दिवसांच्या गणपती विसर्जनानंतरही पगार झाला नसल्याने त्यांचा हिरमोड झाला आहे. शिक्षकांचे आर्थिक गणित कोलमडल्याने आनंदावर विरजण घालीत अखेर गणेशोत्सव साजरा करावा लागत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

# ई-गव्हर्नन्समध्ये मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची बाजी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** राज्यात सुरू असलेल्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा मोहिमेत मीरा-भाईंदर वसई-विरार (एमबीव्हीव्ही) पोलिस आयुक्तालयाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या कामगिरीबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस आयुक्त आणि संपूर्ण एमबीव्हीव्ही पोलिस पथकाचे अभिनंदन केले.

हा राज्यव्यापी उपक्रम ७ मे २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत राबविला जात आहे, ज्याचा उद्देश राज्य, विभाग आणि जिल्हा पातळीवर प्रशासन अधिक जन-अनुकूल, पारदर्शक आणि गतिमान करणे आहे. या मोहिमेचा अंतरिम आढावा २९ ऑगस्ट रोजी घेण्यात आला. यामध्ये, सर्व विभाग आणि पोलिस आयुक्तालयांचे अधिकृत वेबसाइट, डॅशबोर्ड, आपले सरकार पोर्टल, ई-ऑफिस सिस्टम, व्हॉट्सअॅप, चॅटबॉट यासह अनेक पॅरामीटर्सवर मूल्यांकन करण्यात आले. ब्लॉकचेन आणि जीआयएस तंत्रज्ञानाचा वापर देखील समाविष्ट होता.

या मूल्यांकनात एमबीव्हीव्ही पोलिस आयुक्तालयाने महाराष्ट्रातील सर्व पोलिस आयुक्तालयांमध्ये अव्वल स्थान पटकावले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः पोलिस आयुक्तांना प्रमाणपत्र सादर करून या यशाचे कौतुक केले. या १५० दिवसांच्या मोहिमेचे अंतिम निकाल २ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केले जातील. तोपर्यंत, राज्य सरकारने सर्व विभाग आणि संस्थांना अधिक प्रभावी आणि लोकाभिमुख प्रशासन सुनिश्चित करण्यासाठी त्यांचे प्रयत्न तीव्र करण्याचे आवाहन केले आहे.





# आयरेगावातील बेकायदा इमारत रहिवासमुक्त करण्यासाठी हालचाली

**न्यायालयाचे इमारतीवर कारवाईचे आदेश**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली - डोंबिवली पूर्व आयरे गाव हद्दीतील टावरीपाडा येथील समर्थ कॉम्पलेक्स ही बेकायदा इमारत तोडण्याचे मुंबई उच्च न्यायालयाने दोन वेळा आदेश दिले आहेत. न्यायालयाच्या आदेशावरून ही बेकायदा इमारत जमीनदोस्त करण्यासाठी, या इमारतीमधील रहिवाशांची घरातून बाहेर काढण्यासाठी मानसिक तयारी करावी.

तसेच, ही इमारत रहिवासमुक्त करण्यासाठी सहकार्य करण्याची मागणी कल्याण डोंबिवली पालिकेच्या ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी रामनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांच्याकडे केली आहे.

आयरे टावरीपाडा येथील समर्थ कॉम्पलेक्स बेकायदा इमारत ६५ महारेरा बेकायदा इमारत प्रकरणाच्या यादीत आहे. तसेच, ही इमारत उभी राहिलेल्या एका जमीन मालकाचा हक्क डावलून इतर भाऊबंधांनी भूमाफियांना हाताशी धरून या सात माळ्याच्या बेकायदा इमारतीची उभारणी केली आहे. हक्क डावललेल्या वारसाने उच्च न्यायालयात याप्रकरणी याचिका दाखल केली होती.

न्यायालयाने या प्रकरणात या इमारतीवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. वास्तुविशारद संदीप पाटील यांच्या ६५ महारेरा बेकायदा इमारत प्रकरणातही या इमारतीचा समावेश आहे.

# अपघात प्रवण स्थळांच्या सर्व्हेसाठी कोट्यवधीचा घाट ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग आणि इतर जिल्हा मार्गावरील अपघात प्रवण अपघात प्रवण स्थळांच्या सर्वेक्षणासाठी सुमारे एक कोटी रुपया खर्च करण्याचा घाट घालण्यात आला आहे.

जिल्ह्यातील वीस अपघात प्रवण स्थळांच्या सर्व्हेक्षणासाठी एक कोटी रुपये तत्कालीन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या आदेशाने जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर करण्यात आले आहेत. साडे पाच लाख रुपये प्रती अपघात प्रवण स्थळ असा दर निश्चित करून ठेकेदाराला कार्यदिश देण्यात आले आहेत. जिल्हा नियोजन समिती आणि सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अपघात प्रवण स्थळांच्या सर्वेक्षणासाठी एक कोटी रुपयांच्या प्रस्थावीत खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे,

पालघर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग तसेच राज्य मार्गावरील अपघात प्रवण स्थळांचे सर्व्हेक्षण आणि अपघात रोखण्यासाठी उपाययोजनां बाबत अहवाल सादर करण्यासह कामावर देखरेख करण्यासाठी सल्लागार कंपनीची नेमणूक करण्यात आली आहे. सन्व्हेक्षणासाठी पालघर जिल्ह्यातील वीस अपघात प्रवण स्थळे निश्चित करण्यात आली असुन एका अपघात प्रवण स्थळासाठी साडे पाच लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

जिल्हा नियोजन समितीच्या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनांचे मूल्यमापन, संनियंत्रण व डाटा इंट्री करण्याच्या लेखशीर्षा अंतर्गत एका कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. सर्व्हेक्षणा सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता क्रमांक दोन यांचे नियंत्रण आणि मार्गदर्शनात सर्व्हेक्षणाचे काम करण्यात आले आहे.

# बदलापूर : महिला पोलिस कॉन्स्टेबलची आत्महत्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर:** एका महिला पोलिस कॉन्स्टेबलने इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना बदलापुरात घडली आहे. शुक्रवारी रात्री ९.३० च्या सुमारास बदलापूर पश्चिम भागातील एका इमारतीत हा प्रकार घडला आहे. इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या मुंबई पोलिस दलातील ३६ वर्षीय महिला पोलिस कॉन्स्टेबलने रात्री ड्युटीवरून घरी परतल्यानंतर राहत्या घराच्या गॅलरीतून खाली उडी मारून आत्महत्या केली. याबाबत माहिती मिळताच बदलापूर पश्चिम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला.

या प्रकरणी बदलापूर पश्चिम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या महिलेने आत्महत्या करण्यामागे नेमके कोणते कारण होते, याचा पोलिस तपास करीत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर शिंदे यांनी दिली आहे







# माटुंगा येथील जीएसबीचा गणपती भारतातील सर्वात श्रीमंत गणपती

**- रवींद्र मालुसरे**
**अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**
**९३२३११७७०४**

गणेश ही पौराणिक हिंदू धर्मातील प्रथम पूज्य व त्या एक मुख्य देवता आहे.विघ्नहर्ता, बुद्धीची देवता आणि सर्व देवांमध्ये गणपती बाप्पा हा प्रथम पूजनीय मानतो. गणेशोत्सव म्हणजे भक्तिभाव, श्रद्धा आणि आनंदाचा उत्सव ! सोबतच मांगल्य, उत्साह आणि जल्लोष यांचा संगम! श्रीगणेश उपासना करणारे लाखो भक्त भारतात आहेत. श्रीगणेश ही तर महाराष्ट्राची लाडकी देवता आहे. ऐहिक किंवा आध्यात्मिक सुखाच्या अपेक्षेने हे भक्त अनेक प्रकारे या देवतेची उपासना करतात. कोणत्याही मंगल कार्याला आरंभ करताना मंगलमूर्ती श्रीगजाननाचे मंगलमय स्मरण करणे ही सज्जनांची परंपरागत पध्दती आहे. कारण तो विघ्नहर्ता आहे. तो विघ्नराजही आहे. तो आपल्या सामर्थ्याने विघ्नांना प्रेरणाही देऊ शकतो व विघ्नांचे दमन आणि शमनही करू शकतो.

भव्य- दिव्य गणेशमूर्ती आणि अनोखी सजावट हे मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सवाचे मुख्य आकर्षणाचे केंद्रबिंदु आहे. मुंबईतील अशी अनेक प्रसिद्ध गणेश मंडळे आहेत, जे कित्येक वर्षांपासून गणेशोत्सवाची परंपरा आनंदाने साजरी करत आहेत. मुंबईत सार्वजनिक गणपती आता मंडपात सज्ज झालेले पाहायला मिळत आहे. गणपती म्हटलं की, सर्वत्र आपल्याला धामधूम आणि भक्तांची गर्दी पाहायला मिळते. मुंबईतील आकर्षणाचा केंद्रबिंदू आणि भारतातील सर्वात श्रीमंत गणपतीची मूर्ती म्हणून मुंबईतील माटुंगा येथीलजीएसबीचा गणपती ओळखला जातो. कर्नाटकातून आलेल्या गौड सारस्वत ब्राह्मण समुदायाने १९५५ साली जी. एस. बी समाजातील माधव पुराणिक यांनी या गणेशोत्सवास सुरूवात केली. त्याकाळी लहान स्वरूपात सुरू झालेली ही गणेशपूजा आज भव्य दिव्य झाली आहे.आजही मुंबईत जी.एस.बी समाजातील व्यक्ती एकत्र येऊन गणेशपूजा करतात. जी.एस. बी मंडळ हे सार्वजनिक गणेशमंडळ असले तरीही या गणेशमूर्तीची स्थापना केवळ ५ दिवसांसाठी किंग सर्कल येथील जी.एस. बी स्पोर्ट्स क्लब ग्राऊंडवर केली जाते.जी. एस. बी गणपतीसाठी खास दिखाव्याची किंवा थीमची रोषणाई केली जात नाही. हे मंडळ केवळ धार्मिक परंपरेनुसार नियमित पूजा करते.गेली कित्येक वर्षे हे मंडळ आपली परंपरा कायम राखून आहे. जीएसबी गणपतीची मूर्ती ही पर्यावरणपूरक असून ही मूर्ती चिकणमाती, गवत आणि नैसर्गिकरित्या पाण्याच्या रंगानी बनवण्यात येते.मात्र मूर्तीला शुद्ध सोन्याची आभूषणे घातली जातात. गणपतीचे अनेक अवयवही सोने-चांदीच्या दागिन्यांनी बनवलेले आहेत. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या दागिन्यांनी मढवलेला हा गणपती असतो. गणेशोत्सवाच्या या पाच दिवसात विविध होम, पूजा अर्चना चालते. जीएसबी गणेश मंडळाची मुर्ती ही दरवर्षीप्रमाणे यंदा सुद्धा पहिल्याच दिवशी सोनं, चांदी अर्पण करण्यात येते. त्यामुळे कोट्यवधी रुपयांच्या दागिन्यांनी मढवलेला हा गणपती असतो.

यावर्षी गणेशोत्सवाचे ७१ वे वर्ष आहे, जे २७ ते ३१ ऑगस्ट दरम्यान नेहमीच्या ठिकाणी म्हणजेच श्री सुक्रतेंद्र नगर, किंग्ज सर्कल येथे बाप्पा विराजमान झाले आहेत. शहरातील हे एकमेव गणेश मंडळ आहे जेथे चोवीस तास विधी केले जातात. पाच दिवस दर्शनासाठी मोठा जनसमुदाय येतो, त्यांच्या सुरक्षेसाठी मंडळामध्ये हाय डेन्सिटी कॅमेरे बसवण्यात आले आहेत. दररोज ५० हजार भाविकांसाठी भोजन व प्रसादाची व्यवस्था आहे. येथे भाविकांकडून महागणपतीला सरासरी ६० हजार पूजा व सेवा अर्पण केल्या जाणार आहेत असे मंडळाचे अध्यक्ष अमित पै यांनी सांगितले

महागणपतीची मूर्ती ६६ किलोहून अधिक सोन्याचे दागिने आणि ३३६ किलो चांदी व इतर मौल्यवान साहित्याने सजवण्यात आली आहे. त्यामुळेच दागिने आणि गणेशभक्तांच्या सुरक्षेसाठी मंडळाने ४७४.६४ कोटी रुपयांचा विमा करून घेतला आहे. या विम्याच्या रकमेत सोने, चांदी आणि इतर दागिन्यांचा समावेश आहे. याशिवाय मंडळात दर्शनासाठी येणारे भाविक, स्वयंसेवक, पुजारी, स्वयंपाकी, स्टॉल कर्मचारी, सुरक्षा रक्षक आदींचाविमा समाविष्ट आहे.गणेशभक्तांनी अर्पण केलेल्या दागिन्यांनी गणेशमूर्ती सजवली जाते आणि पाच दिवस अखंडपणे येथे धार्मिक विधी केले जातात. त्यामुळे गणेशभक्त मोठ्या संख्येने येतात. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून गणेश मंडळे दरवर्षी दागिने आणि सेवेत गुंतलेल्या लोकांच्या सुरक्षिततेसाठी विमा उतरवतात असे जी आर भट यांनी सांगितलेवाराणसी येथील धर्मपीठ श्री काशी मठ संस्थानशी जी. एस. बी. सेवा मंडळाची निष्ठा आहे आणि प्रत्येक मुंबईकराच्या हृदयाच्या अगदी जवळ आहे. गणेश चतुर्थीच्या भव्य उत्सवामुळे मंडळाला जागतिक स्तरावर प्रशंसा प्राप्त झाली आहे. सामाजिक कार्ये आणि धर्मादाय उपक्रमांमधील वाढ हे धर्मगुरू, परमपूज्य श्रीमद् सुधींद्र तीर्थ स्वामीजी आणि आपले सध्याचे मठाधीपती श्रीमद् संयमींद्र तीर्थ स्वामीजी यांच्या आशीर्वाद आणि अविरत मार्गदर्शनामुळे होत असते.

सामाजिक आणि धर्मादाय कार्यात आघाडीवर असलेल्या या संस्थेची स्थापना १९५१ मध्ये एक ना नफा ना तोटा या तत्वावर झाली. आणि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायदा, १९५० अंतर्गत नोंदणीकृत झाली. जी. एस. बी. सेवा मंडळ सातत्याने गरजू आणि वंचितांपर्यंत पोहोचण्यासाठी सतत प्रयत्नशील असते. गेल्या काही वर्षांपासून सर्व उपक्रमांसाठी सर्व कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक तत्वज्ञान 'सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे संतु निरामयः' आहे. संस्थेच्या वतीने मीरा - भाईंदर येथे १०० खाटांचे बहु-उद्देशीय धर्मादाय रुग्णालय बांधण्याचा प्रयत्न करतो आहे. सर्वांना परवडणाऱ्या किमतीत जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा प्रदान करणे हे संस्थेचे उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प एका प्रामाणिक मिशन स्वरूपात हाती घेतला गेला आहे आणि अपेक्षित वेळेपूर्वी तो पूर्ण करण्यासाठी पदाधिकारी कठोर परिश्रम करत आहोत. बांधकामाला जोमाने सुरुवात झाली आहे त्यामुळे सर्व भाविकांनी पुढे येऊन या प्रकल्पासाठी उदार हस्ते देणगी देण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच मुंबई आणि ठाण्याच्या मध्यभागी असलेल्या विविध रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांसाठी "संतुष्ट अन्न दान सेवा" दररोज राबविण्यात येते. यापूर्वी गरिबांसाठी मुंबई, ठाणे आणि डोंबिवलीमध्ये मोफत लसीकरण शिबिरे, कोकणातील पुराच्या वेळी, खेड, चिपळूण तसेच केरळमधील पूरग्रस्त भागात पाणी, अन्न, कपडे इत्यादी पुरवण्यासाठी पुढाकार घेतला. शिक्षण आणि वैद्यकीय मदत, सामूहिक उपनयन, ज्ञान शिबिर, तरुणांना करिअर मार्गदर्शन आणि इतर अनेक सामाजिक उपक्रम देखील राबविण्यात येतात. अनेक दृष्टिहीन व्यक्तींसोबत जवळून काम करत आहोत आणि त्यांना सन्माननीय जीवन जगण्यास मदत करण्यासाठी मदत केली जाते. आमच्या धर्मगुरूंच्या आशीर्वादाशिवाय आणि तुमच्या उदार योगदानाशिवाय हे सर्व शक्य झाले नसते अशी गौड सारस्वत ब्राम्हण समाजातील सर्वच व्यक्तिंची भावना आहे.या गणपती बाप्पाचे दिवस-रात्र राबणारे कार्यकर्ते हे उद्योजक आणि पदवीधर असतात त्याचप्रमाणे निरक्षर लोकही निरपेक्ष भावनेने सर्व कार्यात मनोभावे समरस होत असतात. स्त्री-पुरुष, लहान-थोर, गरीब श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी, भारतातीलच नव्हे, तर परदेशातीलसुद्धा असे अनेक प्रकारचे भक्त मनोभावे नवसाला पावणाऱ्या या बाप्पाच्या दर्शनासाठी येत असतात. श्रीगणेशाची पूजा आणि साधनेच्या पलीकडे जाऊन प्रत्येक भक्ताशी आपुलकीचे नाते जोडणारा जी. एस. बी. सेवा मंडळाचा हा श्रीगणराया बुद्धी आणि शौर्याचे प्रतीक आहे.या मंडळाचे मुख्य संयोजक डॉ भुजंग पै आहेत तर सहसंयोजक म्हणून श्री. जि दामोदर राव, गणेश प्रभू, डॉ दीपक शेणॉय, डॉ अजित कामत, ऍड रामचंद्र किणी, श्रीमती विजया कामत, श्रीनिवास कामत हे आहेत तर मंडळाचे विद्यमान अध्यक्ष श्री अमित पै, सेक्रेटरी विष्णू कामत, उपाध्यक्ष कृष्णा कामत, सहसेक्रेटरी शिवानंद भट, खजिनदार विठ्ठलदास भट आहेत.

## संविधानाला आकार देण्यासाठी डॉ. बाबासाहेब विचार मंच वचनबद्ध



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डॉ. बाबासाहेब विचार मंच या सामाजिक संघटनेच्या स्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी चिचपोकळी येथील विद्यार्थी उत्कर्ष मंडळात पहिली बैठक आयोजित करण्यात आली होती. या पहिल्या बैठकीत संयोजक आर.एन. यादव, डॉ. अमर बहादूर पटेल, पत्रकार नामदार राही, यशपाल शर्मा, शिक्षिका विद्या शर्मा, प्राध्यापक उषा मधू, डॉ. शशिकला पटेल, कवी रवी यादव, उद्योजक मिथुन कांबळे, अशोक वाघमारे, संजय जगताप, माजी एसीपी मुंबई उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित ही संघटना स्थापन केली जात आहे हे लक्षात घेतले पाहिजे. यावेळी अजेंडा सादर करताना संयोजक, सामाजिक कार्यकर्ते आर.एन. यादव म्हणाले की, सर्वहारा समाजातील गरीब आणि गरजू लोकांच्या आरोग्य आणि शिक्षणाच्या गरजा पूर्ण करण्यासोबतच, हि संघटना डॉ. बाबा साहेबांच्या संविधानाला खऱ्या अर्थाने आकार देण्यासाठी वचनबद्ध आहे. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात मदत केली जाईल, तर गरजू रुग्णांना आरोग्य क्षेत्रात मदत केली जाईल. याशिवाय आवश्यक ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा बसविण्यासाठी आणि देखभालीअभावी सन्माननीय स्थितीत नसलेल्या पुतळयांची दुरुस्ती करण्यासाठी पावले उचलली जातील. संस्थेशी संबंधित मोठ्या संख्येने विद्वानांनी आपले विचार व्यक्त केले. मधुराज मधू यांनी संघटना चालविण्यासाठी आणि मजबूत करण्यासाठी अनेक सूचना दिल्या. डॉ. अमर बहादूर पटेल यांनी उपस्थित लोकांना संविधानाची शपथ दिली.

## अंबरनाथ येथे निरंकारी भक्तांचे रक्तदान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : संत निरंकारी मिशनच्या वतीने डोंबिवली झोन अंतर्गत अंबरनाथ ब्रांच तर्फे रविवारी शिवम मंगल कार्यालय, अंबरनाथ येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये 90 निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यामध्ये 70 पुरुष तर 20 महिला रक्तदात्यांचा समावेश होता. संत निरंकारी रक्तपेढीने यावेळी रक्त संकलन केले.

मंडळाचे डोंबिवली झोन क्षेत्रीय प्रभारी रावसाहेब हसबे यांच्या प्रमुख उपस्थितीत नामस्मरण करत या रक्तदान शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. या शिबिराला सदिच्छा भेट देणाऱ्यांमध्ये माजी नगरसेवक ॲड निखिल वाळेकर व जेष्ठ पत्रकार अंबरनाथ टाइम्सचे संपादक कमलाकर सुर्यवंशी यांचा समावेश होता. या मान्यवरांनी मिशनच्या मानवतावादी कार्याचे कौतुक केले. सेवादल क्षेत्रीय संचालक जनार्दन म्हात्रे यांच्यासह सेक्टर संयोजक किशन नेनवानी व जगन्नाथ म्हात्रे यांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचा उत्साह वाढविला.

## एकनाथ ढमाळ यांची सहा. संचालक व सरकारी अभियोक्ता पदावर नियुक्ती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने राज्यातील 30अतिरिक्त सरकारी अभियोक्त्यांना पदोन्नती देऊन सहा. संचालक व सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त केले आहे. या पदोन्नतीत ठाणे जिल्ह्यातील अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री. एकनाथ भानुदास ढमाळ यांची निवड होऊन त्यांची नियुक्ती ठाणे येथे करण्यात आली आहे.

श्री. ढमाळ यांची 2002 मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहा. सरकारी अभियोक्ता (गट-अ) म्हणून निवड झाली होती. त्यानंतर मुंबई, रायगड व ठाणे जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये त्यांनी शासनाच्या वतीने प्रभावीपणे कामकाज केले. प्रविण महाजन अटक व रिमांड कार्यवाही तसेच अजमल कसाब अटक व रिमांड प्रक्रियेसारख्या अत्यंत महत्त्वाच्या खटल्यांमध्ये त्यांनी शासनाची बाज यशस्वीपणे मांडली. सन 2021 मध्ये त्यांची अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून पदोन्नती झाली. ठाणे व बेलापूर येथील उपन्यायालयांमध्ये काम करताना त्यांनी दोषसिद्धीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढवले असून अनेक गंभीर खटल्यांमध्ये आरोपींना शिक्षा झाली.

आता सहा. संचालक व सरकारी अभियोक्ता म्हणून श्री. ढमाळ यांच्यावर ठाणे व पालघर जिल्ह्यातील कार्यालयीन प्रशासकीय कामकाज, अधीनस्थ सरकारी अभियोक्त्यांचे न्यायालयीन कामकाजाचे मार्गदर्शन व देखरेख, तपासी यंत्रणांना गुन्ह्याच्या तपासाबाबत अभिप्राय देणे, शासनाच्या विविध समित्यांवर कामकाज करणे, तसेच कायदेशीर सेमिनार आयोजित करणे अशा महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

श्री. ढमाळ यांच्या या पदोन्नतीमुळे ठाणे जिल्ह्यातील अभियोक्ता विभागाच्या कार्यक्षमता व न्यायदान प्रक्रियेतील प्रभावीपणात आणखी वृद्धी होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## भिवंडी तालुक्यात हिरव्या गौराईचे आगमन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील) : भिवंडी तालुक्यात गणपती या सणा बरोबरच हिरव्या गौरीचे काल थाटामाटात उत्साहाने आगमन झाले. ग्रामीण भागातकालपासून घरोघरी वेल-फुलांच्या या हिरव्या गौरींना थेट घरात आकर्षक आरास करून स्थान देण्यात आले. ही आरास शक्यतो महिला वर्गच करत असते त्यात पाटावर चादर अंथरूण त्यावर तांदळाची रास ठेवून लक्ष्मीच्या रूपाने आलेल्या झाड वेलींचे गौरीचे स्वागत ग्रामीण भागात उत्साहात करण्यात आले. भिवंडी ग्रामीण भागात, अंबाडी वज्रेश्वरी, गणेशपुरी, घोटगावं वेढे, सावरोली, दुगाड, आनगावं, शेलार या भागात काही , ठिकाणीचं माती, शाडूच्या गौरींच्या मूर्ती बसवण्यात आल्या. तर काही ठिकाणी गौरींचे मुखवटे तयार करून त्याचे पुजन करण्यात आले. मात्र येथील ग्रामीण भागात शेतक-यांनी मात्र पारंपारिक पध्दतीच्या उत्सवास पसंती दिली. पारंपरिक गौरी हा सण म्हणजे माहेराला आलेली माहेरवाशिण या श्रध्देनुसार ग्रामीण भागात जंगलातील विविध वेली, गौरीच्याच नावाने परिचित असणारे झाड वेली त्यात गौरीं चे फुले इंदईचे आकर्षक फुल, सिंदीचे फुल, गायगवारीची वेळ, गोमेठी वेल, कंटोळीची वेल, कांदवेल आदी जंगलातील वेली दिंडीच्या पानात लेपून हिरवी गौराई घरोघरी आणण्यात आली. या हिरव्या गौराईला महिलांनी मंगळसूत्र, हिरव्या बांगड्या, नथ आदी आभूषणे घालून तिची पुजा केली. तसेच काही कटुंबा मध्ये गंगा, व गौरी या दोन्ही बहिणी येतात त्यामुळे महिलांनी घरात तांबड्या - मातीचे पट्टे ओढून त्यावर तांदळाच्या पिठाने व कुंकू ने गौरीची पावले उमटवली. माहेराला आलेली गौरी संपूर्ण घरात आनंदाने भरल्या मनाने आणि प्रेमाने फिरते हा यामागील भाव आहे. अशी माहिती गणेशपुरी येथील रेणुका रवींद्र पाटील यांनी दिली गौरीसाठी अळू,भेंडी, माठाची भाजी यांचा नैवेद्य दाखवला जातो. खेड्यापाड्यात अळूचे पान, तांदळाचे पीठ, दही यापासून पातवड नावाचा खास पदार्थ बनवला जातो. अतिशय रुचकर असणारा हा पदार्थ वर्षातून एकदाच लाडक्या गौराईसाठीच बनवला जातो. दोन दिवस गौराईचे जागरण केले जाते. आजुबाजुच्या महिला एकत्र जमतात गौरींची गाणी गातात. तिस-या दिवशी शेतक-याच्या शेतात गौरींचे विसर्जन केले जाते. ज्या शेतात गौरीं विसर्जन करतात त्या शेतात भरपूर भात येतो क असा भाव शेतक-यांमध्ये असतो . अशा प्रकारे गौरींचा सण ग्रामीण भागात साजरा केला जातो.

## मुरबाड तहसिल कार्यालयासमोर ओबीसी समाजाचा साखळी उपोषणाचा इशारा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : गेल्या 29 ऑगस्ट पासून मुंबई आझाद मैदानात मराठा समाजाचे जोरदार उपोषण सुरु असून सरकारवर दबाव टाकून ओबीसी आरक्षणातून मराठ्यांचा सरसकट समावेश करून घेण्याची व ओबीसी प्रमाणपत्र देण्याची चुकीची मागणि होत आहे. असे झाल्यास हा ओबीसी समाजावर अन्याय होईल या अन्याय विरोधात ओबीसी समाज हि आक्रमक होताना दिसत आहे. समाजाच्या विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालय मुरबाड येथे ४ सप्टेंबर २०२५ रोजी साखळी उपोषण व आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील विविध ओबीसी संघटनांच्यावतीने हे आंदोलन होणार असून, यावेळी तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन सादर केले जाणार आहे.

या आंदोलनाची रूपरेषा निश्चित करण्यासाठी तालुक्यातील सर्व ओबीसी समाजातील घटकांच्या प्रमुखांची बैठक एक सप्टेंबर रोजी कुणबी भवन येथे संपन्न झाली. यावेळी आंदोलनाचे नियोजन, साखळी उपोषणासाठी आवश्यक तयारी तसेच प्रशासनाशी संपर्क याबाबत चर्चा करण्यात आली असून साखळी उपोषणाचे निवेदन आज ओबीसी बांधवांच्या वतीने मुरबाड तहसीलदारांना देण्यात आले.

ओबीसी समाजातील सर्व संघटना, व समाजबांधव यांनी नियोजित आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सर्व ओबीसी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

आंदोलनाचे निवेदन देण्यासाठी मुरबाड तालुका कुणबी समाज संघटनेचे तालुका अध्यक्ष गणपत विशे, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पवार, उमेश पाटिल,ओबीसी उपोषणकर्ते शंकर वडवले, सोपान गोल्हे, नितीन राणे, यशवंत जाधव, पत्रकार श्याम राऊत उपस्थित होते.

## पायल कबरे यांचा आदर्श 'पुस्तकदान गणेशोत्सव'




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : सार्वजनिक एकात्मता दर्शवणारा गणेशोत्सव देशभरात आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला जातोय. मात्र, अनेक घरगुती आणि गणेशोत्सव मंडळ सजावट आणि मूर्तीवर वारेमाप खर्चही होतो . तर काहीजण गणेशोत्सव समाज विधायक उपक्रम व देखाव्यांनी साजरा करतात. विद्येची देवता असणाऱ्या गणरायाच्या या गणेशोत्सवांचा मूळ उद्देश विद्यादानाचा हा साधण्याचा प्रयत्न अंबरनाथ मधील कबरे परिवाराने केलाय. कबरे यांनी आपल्या घरगुती गणेशोत्सवा निमित्त दर्शनास येणाऱ्या भाविकांना गरजवंत विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य आणण्याचे आवाहन केलंय. आणि हे साहित्य आदिवासी विद्यार्थ्यांकरिता बहाल केले आहे.

अलिकडेच निधन पावलेल्या अंबरनाथच्या माजी नगराध्यक्षा पुर्णिमा सुधीर कबरे यांनी आपल्या घरी गणेश स्थापनेची सुंदर परंपरा सुरू केली होती. त्यांच्या निधनानंतर त्यात कोणताही खंड न पडू देता त्यांची कन्या, भारतीय जनता पक्षाच्या "बेटी बचाओ बेटी पढाओ" या उपक्रमाच्या प्रदेश प्रभारी , पायल कबरे व भाजप नेते सुधीर कबरे यांनी ही परंपरा अबाधित ठेवलीय. पण कबरे परिवाराने यावर्षी निमंत्रित भाविकांनी घरी गणपतीला दर्शनासाठी येताना मोदक, पेढे किंवा फुलेहार न आणता, एक पुस्तक , वही आणण्याचं आवाहन केलं होतं . या आवाहनाला उत्तम प्रतिसादही मिळालाय . यात रोटरीयन पराग सुळे, सामाजिक कार्यकर्ते प्रतीक काच्या , अर्जुन थाटे यासारख्या अनेक भाविकांनी या उपक्रमाचे कौतुक करून शालेय साहित्य गणरायाच्या चरणी अर्पण केलंय. या उपक्रमाअंतर्गत जमा झालेली सर्व पुस्तके ,वह्या , चित्रकलेचे साहित्याचे , पायल यांनी त्यांच्या तितीक्षा फाउंडेशनतर्फे वीटभट्टीवर काम करणाऱ्या मजुरांच्या गरजू विद्यार्थ्यांना वाटप केले आहे.

ह्याआधीही तितीक्षा फाउंडेशनतर्फे दोन शाळांमध्ये "कायालय पालट" आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी छोटे ग्रंथालय उभारण्यात आले आहे. त्यामुळे पायल कबरे यांचा गणेशोत्सव हा चर्चेचा विषय ठरला आणि भाविक त्यास भरघोस प्रतिसाद ही देत आहेत.









| मेष | सिंह | धनु |
|---|---|---|
| तुम्हाला ऑफिसमध्ये एक नवीन प्रोजेक्ट मिळेल, जो पूर्ण करण्यात तुमचे सहकारी तुम्हाला मदत करतील. वडिलांचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहतील. | मनाला शांती मिळेल.कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील. ऑफिसचे काम लवकरच पूर्ण कराल. उर्जेने खूप काही साध्य कराल. | तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. जोडीदाराकडून सहकार्य मिळेल.कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील. ऑफिसचे काम पूर्ण कराल. |
| **वृषभ** | **कन्या** | **मकर** |
| कोणतेही प्रकरण शांततेने सोडवण्याचा प्रयत्न करा. संध्याकाळी मित्रांसोबत जास्त वेळ घालवाल, त्यांच्यासोबत भविष्याचा विचार कराल. | आरोग्याच्या दृष्टीने आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे.अतिविचारामुळे तुम्हाला गुंतागुंतीचा सामना करावा लागेल. | तुमचे सोशल नेटवर्क अधिक मजबूत होईल. मुलांकडून काही विशेष आनंदाची बातमी मिळेल, घरातील सर्वजण आनंदी होतील. |
| **मिथुन** | **तूळ** | **कुंभ** |
| आनंदाची बातमी ऐकायला मिळेल.मेडिकल स्टोअर मालकांना आज अपेक्षेपेक्षा जास्त पैसे मिळतील. कुटुंबासमोर मांडण्याची पूर्ण संधी मिळेल. | लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील. तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.तुमची कामाची क्षमता वाढवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाची मदत घ्याल. | जुन्या गोष्टींच्या त्रासात पडणे टाळावे. छोट्या-छोट्या गोष्टींवर राग आल्याने काही लोक तुमचा विरोध करू शकतात, रागावर नियंत्रण ठेवावे. |
| **कर्क** | **वृश्चिक** | **मीन** |
| गुंतवणुकीच्या बाबतीत तुम्हाला घरातील वडीलधाऱ्यांकडून काही नवीन सल्ला मिळेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. | तुमच्या व्यवसायाचा विस्तार करण्याचे काही नवीन मार्ग तुमच्या मनात येतील. तुमचे विचार तुमच्या वडिलांसोबत शेअर करा. | समस्यांचे निराकरण होईल. तुमचे काम सोपे होईल. मन देवाच्या भक्तीमध्ये गुंतलेले असेल, मंदिरात जाऊ शकता जिथे आनंद मिळेल. जोडीदाराचा सल्ला घ्या. |

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# ठाणे मनपा क्षेत्रात पाचव्या दिवशी ८९८४ गणेश मूर्तींचे विसर्जन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रातील पाचव्या दिवसाच्या गणेश मूर्तींचे विसर्जन रविवारी भक्तीमय वातावरणात संपन्न झाले. यावर्षी महापालिका क्षेत्रात पाच दिवसांच्या ८९८४ गणेश मूर्तींचे विसर्जन झाले. त्यापैकी ४८११ मूर्ती शाडू मातीच्या तर, ४१७३ मूर्ती पीओपीच्या होत्या. पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची संकल्पना राबवून राज्यात पर्यावरणभिमुख गणेशोत्सवाचा आदर्श घालून देणाऱ्या ठाणे महापालिकेच्या पर्यायी गणेश विसर्जन व्यवस्थेअंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये गणेश मूर्तींच्या विसर्जनाला भाविकांनी याही वर्षी चांगला प्रतिसाद दिला.

त्याचप्रमाणे महापालिकेच्या गणेश मूर्ती स्वीकृत केंद्रामध्ये प्राप्त झालेल्या एकूण २५ गणेश मूर्तींचे तसेच, फिरत्या विसर्जन व्यवस्थेतील ६२ गणेशमूर्तींचे विधिवत विसर्जन करण्यात आले.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात आणि त्यापेक्षा मोठ्या मूर्तींचे विसर्जन खाडी घाटांवर करण्यात येत आहे. काही भाविकांनी छोट्या मूर्तीही खाडीत विसर्जन करण्याचा आग्रह धरला. त्यांना कृत्रिम तलावात विसर्जन करण्यासाठी महापालिका तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने वारंवार विनंती करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर, सातव्या आणि अकराव्या दिवशीही नागरिकांनी सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

कृत्रिम तलाव, फिरते विसर्जन पथक, हौद, स्वीकृती केंद्र येथील सर्व मूर्तींचे विधिवत विसर्जन झाल्यावर पाण्याच्या तळाशी जमणाऱ्या मातीच्या गाळावर प्रदूषण नियंत्रण मंडळाने निश्चित केलेल्या कृती आराखड्यानुसार प्रक्रिया केली जाणार असल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

### ०६ टनाहून अधिक निर्माल्य भक्तांनी केले दान

यावर्षी निर्माल्यापासून बायो कंपोस्टिंग पद्धतीने खत करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या खत प्रकल्पात निर्माल्य जमा करण्यात आले. कोलशेत, कौसा, ऋतू पार्क येथे हे बायोकंपोस्टिंग प्रकल्प कार्यान्वित आहेत. पाचव्या दिवसाच्या



गणेश मूर्ती विसर्जनादरम्यान सुमारे ०६ टनाहून अधिक निर्माल्य संकलित झाले आहे. या निर्माल्यावर प्रक्रिया करून त्याचे सेंद्रीय खत तयार केले जाणार आहे. तसेच, निर्माल्यांतील अविघटनशिल घटकांचे वर्गीकरण करून ते पुर्नप्रक्रियेसाठी पाठवण्यात येणार आहेत.

**०६ टनाहून अधिक निर्माल्य झाले जमा**

### विसर्जनाची आकडेवारी - पाचवा दिवस (विर्सजन स्थळ (संख्या) - गणेश मूर्तींची संख्या - (गतवर्षीची संख्या)

- कृत्रिम तलाव (२४) - ५९९९ - (३९४८)
- विशेष हौद (टाकी) व्यवस्था (७७) - १५३२ (५८१)
- खाडी विसर्जन घाट (०९) - १३६६ - (२४८२)
- फिरती विसर्जन व्यवस्था (१५) - ६२ (००)
- मूर्ती स्वीकृती केंद्र (१०) -२५ (८५)
- एकूण - ८९८४ - (७०९६)

### १५ फिरती विसर्जन व्यवस्था

यावर्षी फिरती विसर्जन व्यवस्था सर्व नऊ प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये उपलब्ध आहे. दुपारी १२ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रभाग समितीमधील विविध ठिकाणी ठराविक काळासाठी हे फिरते वाहन विसर्जन व्यवस्थेसह उपलब्ध राहील. त्यावरील हौदामध्ये गणेश मूर्तींचे विसर्जन करता येईल.

या विसर्जन व्यवस्थेचे वेळापत्रक ठाणे महापालिकेच्या वेबसाईटवर, 'पर्यावरणपूरक गणपती विसर्जन व्यवस्था २०२५' या शीर्षकावर उपलब्ध करण्यात आले आहे. तसेच, हरित विसर्जन ॲपवरीही वेळापत्रक उपलब्ध आहे.

### हौद (टाकी) व्यवस्था ४९ ठिकाणी

दोन वर्षांपासून महापालिकेने कृत्रिम तलावांच्या सोबतीने छोट्या हौदांची (टाक्यांची) व्यवस्था विसर्जनासाठी करण्यात येते. त्यानुसार, गेल्यावर्षी ४९ ठिकाणी टाक्यांची सुविधा उपलब्ध होती. ती संख्या यंदा ७७ एवढी करण्यात आली आहे.

### १० मूर्ती स्वीकृती केंद्रे

तसेच, जेल तलाव, मढवी हाऊस-राममारुती रोड, महागिरी कोळीवाडा, टेंभी नाका, रिजन्सी हाईट्स-आझादनगर, लोढा लक्झेरिया, कामगार हॉस्पिटल, किसन नगर बस स्टॉप, मॉडेला चेक नाका, देवदया नगर-शिवाई नगर या १० ठिकाणी मूर्ती स्वीकृती केंद्रे आहेत.

### २४ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था

आंबेघोसाळे, मासुंदा दत्त घाट, खारीगाव, घोलाई नगर, दातिवली तलाव, खिडकाळी तलाव, न्यू शिवाजी नगर कळवा तलाव, निळकंठ वूड्स- टिकूजीनी वाडी, रेवाळे, बोरिवडे, ब्रम्हांड ऋतू पार्क, हिरानंदानी रायलादेवी-१, रायलादेवी-२, उपवन तलाव परिसर-वर्तकनगर, देवदयानगर, आत्माराम पाटील चौक आदी २४ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे.

### ०९ ठिकाणी विसर्जन घाट

त्याचबरोबर, सहा फुटांपेक्षा मोठ्या मूर्तींसाठी कोपरी, पारसिक रेती बंदर, रेतीबंदर -१, रेतीबंदर-२-राणानगर, शंकर मंदिर घाट, कोलशेत, बाळकूम आदी ०९ ठिकाणी विसर्जन घाटांची व्यवस्था आहे.



**आवरे उरण येथील साईनाथ गावंड व नवनाथ गावंड सर यांच्या घरी सोनपावलांनी आलेली गौराई**



**किर्ती राजू शेळके पारिजात सोसायटी श्रीबाग**

# भिवंडीत गणेश भक्तांचे रक्तदान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहरातील एकात्मतेचा राजा म्हणून गौरवल्या जाणाऱ्या धामणकर नाका मित्र मंडळाच्या सार्वजनिक गणेशोत्सव दरम्यान विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असुन नेत्र चिकित्सा शिबिरा नंतर

आज सकाळी महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आले होते.मुंबादेवी ब्लड अँड थेलेसिमिया डे केयर सेंटर यांच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरात गणेश भक्तांनी उस्फूर्तपणे सहभाग घेत रक्तदान केले.

भारतीय सैन्य दलातील सैनिक तसेच माजी सैनिकांनी सर्वप्रथम रक्तदान करून या शिबिराची सुरुवात करण्यात आली. मंडळाचे अध्यक्ष संतोष शेट्टी यांच्या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. प्रसंगी मंडळाचे प्रमुख पदाधिकारी हसमुख पटेल,दिलीप पोद्दार,मोहन बल्लेवार, संजय भोईर, राकेश पटवारी,चंद्रकांत हेगडे,भिवंडी वॉरियर्स ग्रुपचे फुलसिंग सोळंकी, सुरज भागवत व त्यांचे सैनिक सहकारी उपस्थित होते.

सायंकाळपर्यंत सुरू राहिलेल्या या रक्तदान शिबिरात ५०७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या सर्व रक्तदात्यांना धामणकर नाका मित्र मंडळाच्यावतीने भारतीय पोस्ट विभागाकडील दहा लाख रुपयांचा अपघात विमा प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे.या रक्तदान शिबिरात महिला व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.या रक्तदान शिबिरातून मंडळाने रक्तदात्यांचा अपघात विमा उतरवताना त्यांचे पोस्ट खात्यात बँक खाते सुद्धा या माध्यमातून उघडण्यात आल्याची माहिती अध्यक्ष संतोष शेट्टी यांनी दिली.रक्तदात्यांना भविष्यात बचतीची सुद्धा सवय लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

> दरम्यान शनिवारी धामणकर नाका गणेशोत्सव मित्र मंडळ व 'श्री भैंरव नेत्र चिकित्सा रुग्णालय' यांच्या सयुक्तिक विद्यमाने नेत्रचिकित्सा शिबिर गणेश मंडपात आयोजित करण्यात आले होते.यावेळी शेकडो गणेशभक्तांनी नेत्र तपासणी चिकित्साचा लाभ घेतला. आयोजित नेत्र चिकित्सा शिबिर उद्घाटन सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन सांगळे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसंगी शिबिरात ३३५ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली ज्यामध्ये २१५ रुग्णांना मोफत चष्मे वितरीत करण्यात आले. तसेच नेत्र तपासणीत आढळून आलेल्या २५ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया धामणकर नाका मित्र मंडळाच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती संतोष शेट्टी व संजय भोईर यांनी दिली.

# राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबईच्या अपर उपआयुक्तपदी मनीषा नलावडे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मालेवाडी : मालेवाडी ( तालुका वाळवा,जिल्हा सांगली) गावच्या मनीषा सोनाबाई सदाशिव नलावडे यांची अपर उपआयुक्त (Additional Deputy Commissioner) पदी पदोन्नतीवर राज्य गुप्तवार्ता विभाग,महाराष्ट्र राज्य,मुंबई येथे नियुक्ती झाली आहे. नुकताच सदर पदाचा चार्ज त्यांनी घेतला आहे.अत्यंत प्रतिकुल परस्थितीवर मात करुन त्यांनी ही गरुडझेप घेतली आहे. मालेवाडीतील जिल्हा परिषदेच्या शाळेत पहिली ते सातवीचे शिक्षण, पुढे जवळच्याच तांदुळवाडी येथील पंडीत नेहरू हायस्कूल मध्ये आठवी ते दहावीचे शिक्षण व पुढे इस्लामपूर येथील कन्या महाविद्यालयात उर्वरित शिक्षण पुर्ण केले. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करुन १९९६ मध्ये पी. एस. आय. म्हणून त्यांची एम पी एस सी कडून नियुक्ती झाली. आपल्या सेवेत सतत अ श्रेणी त्यांनी संपादन केली आहे.त्याना त्यांचे सेवाकाळात त्यानी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मा.पोलिस महासंचालक यांचे



सन्मानचिन्ह,राष्ट्रपती पदक, राष्ट्रीय गरुडझेप अवार्ड आणि इतर अनेक बक्षिसे मिळाली आहेत.

या नियुक्ती नंतर आमच्या प्रतिनिधीशी बोलताना त्या म्हणाल्या, आज मी कुठे उभी आहे हे महत्वाचे नाही, तर मी इथे कशी आणि कोठून आले आहे हे महत्वाचे आहे. ज्याने आपले ध्येय लवकरात लवकर निश्चित केले आहे आणि सातत्याने त्या ध्येय पुर्तीसाठी प्रयत्न केला तर त्याला यशाला गवसणी घालणे अशक्य नाही.आजपर्यंतच्या प्रवासात ज्यांनी ज्यांनी मदत केली,विविध प्रसंगी साथ दिली आहे त्या सर्वांचे त्यांनी आभार मानले.मालेवाडी गावात ही बातमी पसरताच आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.गावातील माजी सरपंच व धडाडीचे कार्यकर्ते श्री रंगराव जाधव म्हणाले, मनिषाताईची वेळ घेवून लवकरच संपुर्ण ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्काराचे आयोजन करीत आहोत. मालेवाडी गाव शिवशाहीर बाबासाहेब देशमुख यांच्यामुळे देशभर प्रसिद्ध आहे. या निवडीमुळे परत एकदा या गावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.श्री विलासराव कोळेकर यांनीही या नियुक्ती बद्दल खुप आनंद झाल्याचे स्पष्ट केले. व भविष्यात मालेवाडी गाव अधिका-यांचे गाव कसे होईल यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट केले. आतापर्यंत मालेवाडी करांनी शेतीची अत्यंत प्रामाणिकपणे सेवा केली व प्रगती केली. मात्र शिक्षणामुळेच प्रगतीची दारे उघडतात.म्हणून गावातील मुलासाठी शिक्षणाची विशेष आवड निर्माण करुन प्रगतीचा मार्ग ते कसा धरतील यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

## सामाजिक बांधिलकी जपणारा
# वैश्य युवक मंडळाचा गणेशोत्सव



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : वासिंद येथील वैश्य युवक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुतळ, काट्या, पांढरी रस्सी, गोणपाठ, नारळाच्या व पानांची चटई या वस्तुपासून श्री गणेश मूर्तीची सजावट करण्यात आली असून सामाजिक बांधिलकी जपत हा उत्सव मोठ्या आनंदात आणि उत्सवात साजरा करत आहेत.

वैश्य युवक या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यंदा 36 व्या वर्षात पदार्पण केले आहे. मंडळ नेहमी आपले वेगळेपण जपत दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तूंपासून सुबक आणि आकर्षक बाप्पाची मूर्ती तसेच सजावट (आरस) करत आहे. साबण, मणी, चंदन, आईस्क्रीम, विविध भांडी, क्रिकेट साहित्य, शालेय साहित्य, कोल्डड्रिंक्स, डिस्पोजल वस्तू आदी विषय घेऊन तसेच सामाजिक संदेशात्मक गणपती देखावेही मंडळाने वर्षानुवर्षे सादर केले आहेत.

यंदाही हीच परंपरा पुढे चालू ठेऊन मूर्तिकार राहुल नित्ते व कार्यकर्ते यांनी मिळून सुतळ, काट्या, पांढरी रस्सी, गोणपाठ, नारळाच्या पानांची चटई या वस्तुपासून श्री गणेशा व सजावट करण्यात आली असून सामाजिक बांधिलकी जपत हा उत्सव आनंदाने आणि उपक्रमशीलतेने साजरा करण्यात आले असल्याचे मंडळाचे अध्यक्ष वैभव बिडवी, सदस्य प्रशांत रोठे यांनी म्हटले.

दरम्यान, वैश्य युवक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ हे वासिंद मधील सर्वांत जुने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ असून वासिंदपासून अन्यत्र स्थिरावलेल्या असंख्य लोकांचा श्रद्धा, अभिमान आणि आठवणींचा हा गणेशोत्सव आहे. तर मंडळाने आजतागायत वर्गणीची नसलेली सक्ती, दरवर्षी बदलणारी पदाधिकारी कमिटी, सुबक व आकर्षक गणपती बाप्पा मूर्ती, शांततेत होणारी प्राणप्रतिष्ठापना, उत्कृष्ट व साजेसा डेकोरेशन, पारदर्शक जमाखर्च व कार्य-अहवाल, विविध सांस्कृतिक व प्रोत्साहनपर उपक्रम, शासनाच्या सूचनांचे पालन, सर्वप्रथम घेतलेला गुलालबंदीचा विधायक निर्णय व एकादशीच्या दिवशी परंपरा जपत बाप्पाला निरोप असे वैशिष्ट्य जपले असून आगामी वर्षांतही मोठ्या प्रमाणावर आणखी उपक्रम व कार्यक्रम घेऊन हा उत्सव साजरा करण्याचा निर्धार मंडळाचा आहे.

# गौरीसाठी जून्या घराचे चित्ररूपी मखर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाशिंद : लहान पणी आई-वडिलांकडे रडून रडून मागीतलेली खेळण्यातील सौंसाराची भांडी वापरून गौराईसाठी मखर बनविल्याने लहान पणाच्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न एका मुलीने केल्याने तिचे कौतूक होत आहे

वेगवेगळ्या प्रकारचे मखर व त्यावर केलेली रोषणाईपाहून डोळे दिवले जातात. मात्र धनश्री रूपेश पुन्यार्थी या मुलीने आपल्या बालपणी हट्ट करून जमविलेले गडगूले मडगुले जपून ठेवले होते. अनेक वेळा आईवडीलांनी ती अडगळ नको म्हणून कच-यात ठाकण्याची तयारीही केली होती. पण या मुलीने राहूद्या माझ्या बालपणाची आठवण म्हणून ती जपून ठेवली होती. गौंराई साठी याच खेळण्यांचा उपयोग करून मखर बनवू या असे धनश्रीच्या मनात आल्याने खेळण्यातीलच भांड्यांची मांडण वापरून एक जून्या घराचे चित्ररूपी मखर वनविल्याने तिचे कौतूक होत आहे. लहानपणी टिकावू होती, मोठ्यापणी टाकावू झाली. आणि त्याच टाकावू पासून टिकावू मखर बनविल्याने ज्ञानातही भर पडल्याचे दिसून आले. वैश्य समाजाचे अध्यक्ष निलेश गंध्ये, समन्वय समिती प्रमुख दिलीप भोपतराव व सुधीर जगे यांनी कौतूक केले आहे.

> धनश्री रूपेश पुन्यार्थी या मुलीने आपल्या बालपणी हट्ट करून जमविलेल्या गडगूले मडगुले जपून ठेवून त्यापासून गौराईसाठी पारंपरिक घराचा चित्ररुपी मखर बनवला.




# राज्यभरातील सर्वच मंदिरे मद्य-मांस मुक्त करावीत ! - मंदिर महासंघ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई/यवतमाळ – महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पाठपुराव्यानंतर यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव येथील १०० वर्षे जुन्या श्री शीतला माता मंदिर परिसरातील अतिक्रमणे हटवण्यात आली असून मंदिर परिसर मांसमुक्त झाला आहे. या मंदिराच्या भिंतीला खेटून असलेल्या मांस-मटणाच्या दुकानांमुळे भाविकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते, तसेच मंदिराच्या पावित्र्यालाही बाधा पोचत होती. स्थानिक प्रशासनाच्या या कारवाईमुळे मंदिर संस्कृतीला बळ मिळाले आहे. यवतमाळच्या धर्तीवर शासनाने राज्यभरातील सर्वच मंदिरांचा परिसर मद्य-मांस मुक्त करावा, अशी मागणी महासंघाने शासनाकडे केली



असून त्यासाठी चालू असलेल्या राज्यव्यापी अभियानाला अजून गती देण्याचा निर्धार केला आहे.

मंदिरे ही केवळ वास्तू नसून चैतन्याची आणि सात्त्विकतेची केंद्रे आहेत. महाराष्ट्र ही संतांची भूमी असून मंदिरे ही श्रद्धास्थाने आहेत. मंदिराच्या परिसरात असणाऱ्या मांस, मटण यांच्या दुकानांमुळे मंदिर परिसराचे पावित्र्य भंग होते आणि भाविकांनाही प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागतो. दुर्दैवाने यवतमाळच नव्हे, तर राज्यभरातील अनेक मंदिरांच्या परिसरात मांस, मटण आणि दारूची दुकाने थाटली गेली आहेत. या समस्येचे गांभीर्य ओळखून राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांनी व पोलीस प्रशासनाने तात्काळ कारवाई सुरू करावी, अशी आग्रही मागणी महासंघाने केली आहे.

मंदिर महासंघाच्या वतीने यापूर्वी जी राज्यव्यापी मंदिर अधिवेशने झाली, त्यांमध्ये 'मंदिरे आणि तीर्थक्षेत्रे यांचा परिसर मद्य-मांसमुक्त करा', असे ठराव संमत करून शासनाला दिलेले आहेत. त्याची अंमलबजावणी सरकारने तात्काळ करावी. प्रशासनाने वेळीच पावले न उचलल्यास, महासंघ आपले अभियान राज्यभरात अधिक तीव्र करेल, असा स्पष्ट इशारा महासंघाच्या वतीने देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर ज्या भाविकांना आपल्या परिसरातील मंदिराजवळ अशा प्रकारच्या समस्या जाणवत असतील किंवा ज्यांना या 'मंदिर मद्य मांस मुक्त अभियाना'मध्ये सहभागी व्हायचे असेल, त्यांनी महाराष्ट्र मंदिर महासंघाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात येत आहे.



शिक्षक नेते रविकांत ठाकूर यांच्या रामवाडी निवासस्थानचा गणपती



गिरीधर पिंगळे गुरुजी गोरठण बुद्रुक यांच्या निवासस्थानी विराजमान झालेला गणपती बाप्पा




मळेघर पेण येथील केतन म्हात्रे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेला गणपती बाप्पा



खरोशी पेण येथील सुधाकर घरत यांच्या निवासस्थानी विराजमान झालेली गौराई

# मराठा आंदोलनात पत्रकारांसोबत गैरवर्तन

## ब्लॅक पँथरने व्यक्त केला निषेध

### चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची केली मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मुंबई मधील आझाद मैदान येथे चालू असलेल्या, मराठा आरक्षण आदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचे वृत्तांकन करीत असताना काही पत्रकार व कॅमेरामन यांच्यासोबत गैरवर्तन झाले असल्याची गंभीर घटना समोर आली आहे. लोकशाहीतील चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेवर होणारा हा हल्ला केवळ निदनीय नाही तर लोकशाही व्यवस्थेलाच बाधा आणणारा असल्याचे सांगत ब्लॅक पँथर पक्षाच्या वतीने याचा कल्याणमध्ये निषेध व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी ब्लॅक पँथर पक्षाचे मुंबई प्रदेश महासचिव अजय कांबळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

पत्रकार आणि कॅमेरामन हे सत्य घटनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करतात. त्यांच्यावर झालेल्या अशा प्रकारच्या गैरवर्तनामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात येते. हे कोणत्याही परिस्थितीत मान्य होऊ शकत नाही. ब्लॅक पँथर पक्ष हा सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही मूल्यांसाठी लढणारा राजकीय पक्ष आहे. म्हणूनच या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत महाराष्ट्रातील पत्रकार व माध्यमकर्मी यांची सुरक्षा ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने या घटनेची तातडीने उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित दोषींना ओळखून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात पुन्हा अशा घटना घडू नयेत. पत्रकार बांधव सुरक्षित व निर्भय वातावरणात आपले कर्तव्य पार पाडतील. यासाठी राज्य सरकारने ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे अजय कांबळे यांनी यावेळी सांगितले.

# गणेशोत्सवात ठाकरे गटाचा रोजगार मेळावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा सह संघटक रूपेश भोईर यांनी गणेशोत्सवात भव्य रोजगार मेळावा आयोजित केला आहे. पीएसएन सप्लाय चैन प्रा. लिमिटेड यांच्या माध्यमातून अमेझोन कंपनीत नोकरीसाठी शिबीरचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य म्हणजे मूक बधीर लोकांना सुद्धा नोकरी मिळेल अशी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

4 सप्टेंबर रोजी आयोजित या रोजगार शिबीरा बाबत माहिती देताना रूपेश भोईर यांनी सांगितलं की, गणपती उत्सवात जर आम्ही काही गरजू लोकांना रोजगार देण्यात यशस्वी झालो तर आम्हाला वाटेल की गणपती बाप्पाची भक्ती सफल झाली. रोजगार शिबीर कल्याण पश्चिमेतील सर्वोदय मॉल येथे आयोजित करण्यात आला असून गरजू लोकांनी सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत संपर्क करण्याचे आवाहन भोईर यांनी केले आहे.

# कौशल्य विकास प्रशिक्षण योजना

जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, त्यांचे सर्वांगीण सक्षमीकरण व्हावे, यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जाते आणि १५ ते ४५ वयोगटातील उमेदवारांना यात सहभागी होण्याची संधी उपलब्ध आहे.

**१) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान :**

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग राज्यातील युवक व युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना मागणी असलेल्या उद्योग सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी काम करत आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या स्थानिक विशेष गरजानुसार विशिष्ठ मागणीच्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जाते. सदर प्रशिक्षणाकरीता शैक्षणिक अर्हता ही प्रत्येक अभ्यासक्रमानुसार वेगवेगळी असू शकते.

१० वी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण ते पदवीपर्यंतच्या उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षणाचा लाभ घेता येऊ शकतो.

सदरचे प्रशिक्षण हे तीन ते सहा महिने कालावधीचे (Short Term Courses) असतात.

विविध कोर्सचे कौशल्य प्रशिक्षण जिल्ह्यामध्ये कोठे उपलब्ध होऊ शकेल याची माहिती या विभागाच्या https://www.mahaswayam.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राज्यस्तरावर व किमान कौशल्य विकास कार्यक्रम हा जिल्हास्तरावर राबविला जातो.

आजपर्यंत जिल्ह्यातून १०४९५ उमेदवारांनी या अभियानाचा लाभ घेतला आहे.

**२) प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास कार्यक्रम :**

ग्रामीण भागातून शहराकडे होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण कमी करणेसाठी ग्रामीण भागात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात यासाठी ग्रामीण कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

जिल्ह्यात एकुण १४ प्रशिक्षण केंद्रे कार्यरत आहेत.

त्याद्वारे आजमितीस एकुण ११ हजार ३० उमेदवारांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे.

**३) आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र :**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्येच कौशल्य विकास प्रशिक्षण उपलब्ध व्हावे याकरीता महाविद्यालयामध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.

महाविद्यालयीन शिक्षण घेऊन बाहेर पडताना विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण घेता यावे यासाठी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापना करण्यात आली आहे.

सदर कौशल्य विकास केंद्रामधून आजमितीस एकुण १ हजार ३७ उमेदवारांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला आहे.

**विशेष वैशिष्ट्ये**

सर्व उमेदवारांना मोफत कौशल्य प्रशिक्षण.

१५ ते ४५ वयोगटातील पात्र उमेदवारांना प्रशिक्षणाची संधी.

कोर्स पूर्ण झाल्यानंतर रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधींमध्ये लक्षणीय वाढ.

अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : www.mahaswayam.gov.in

कार्यालय : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग

दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०२९

संकलन
जिल्हा माहिती कार्यालय, रायगड -अलिबाग

# कामातील सातत्य आणि पाठपुरावा हेच यशाचे रहस्य

## -जिल्हाधिकारी किशन जावळे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : आपल्याला कर्मयोगी व्हायचे असल्यास सतत शिकत राहणे आवश्यक आहे. कामातील सातत्य आणि पाठपुरावा हेच यशाचे रहस्य आहे. शासकीय कामकाजातील नोटिंग, टिप्पणी, फायलिंग यांसारख्या मूलभूत बाबी प्रत्येक कर्मचाऱ्याने आत्मसात करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात सेवाविषयक बाबींच्या पुर्तता मेळाव्याचे आयोजन जिल्हा नियोजन भवन येथे करण्यात आले होते, यावेळी ते बोलत होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, नगर पालिका प्रशासन अधिकारी विराज लबडे, सह-जिल्हा निबंधक श्रीकांत सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. जावळे म्हणाले की, अनुकंपा भरतीसंदर्भात शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत जुने ४५ जीआर रद्द करून नवे धोरण लागू केले असून, त्या धोरणानुसार जिल्ह्यातील ग्रामविकास, नगरविकास, पोलीस तसेच इतर सर्व शासकीय विभागांतील प्रलंबित उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त उमेदवारांनी जनसेवेची ही संधी मनापासून आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्षमतेने पार पाडावी. तसेच काही कर्मचाऱ्यांना कालबाह्यबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्यात आला असून, सर्व विभागांनी हा लाभ जानेवारी महिन्यात देण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील १ हजार ३९० कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तके डिजिटायझेशन झाली असून त्यांना सेवार्थ क्रमांक जोडण्याची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी संबंधितांना दिले.

कोतवाल आणि पोलीस पाटील या संवर्गातील प्रलंबित भरती प्रक्रियेत अडचणी दूर होऊन आता नियुक्ती सुलभ झाली आहे, असेही त्यांनी सांगितले. सर्व विभागांनी वर्षातून किमान दोन वेळा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करून कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या विषयांचे प्रशिक्षण द्यावे, असे निर्देश दिले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी केले.

कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सेवा विषयक बाबींच्या अनुषंगाने पात्र लाभार्थींना अनुकंपा नियुक्ती, पदोन्नती शिपाई संवर्ग, आश्वासित प्रगती लाभ योजना (पहिला, दुसरा, तिसरा) नियुक्तीपत्रांचे वाटप करण्यात आले.

# शिवनेरी क्रीडा मंडळाने साकारली बद्रीनाथ धामची प्रतिकृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : शिवनेरी क्रीडा मंडळ जोशीबाग कल्याण पश्चिम सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे यंदा 63 वे वर्षे असून मंडळाने श्री बद्रीनाथ धामची प्रतिकृती साकारली आहे. ही प्रतिकृती पर्यावरण पूरक असून त्यात लाकूड प्लाय, बॉटम, लोखंड, श्रींची मूर्ती शाडू माती पासून बनविली आहे. अनेक भक्तांना चार धाम यात्रा करणे शक्य होत नाही यासाठी मंडळाने यापूर्वी श्री केदार धाम, श्री पशुपतीनाथ धाम असे प्रतिकृती सादर केल्या होत्या, त्या भक्तांच्या मनावर आजही कोरल्या आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मंडळाने या वर्षी श्री बद्रीनाथ धामची प्रतिकृती साकारली आहे. या देखावा मंडळाचे सभासद विशेष सोनवाल यांच्या मार्गदर्शना खाली मंडळाच्या कार्यकर्त्यांनी साकारला आहे.

# कल्याण डोंबिवलीतील गणेशभक्तांचे कृत्रिम तलावात मूर्ती विसर्जनास प्राधान्य

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याण डोंबिवली परिक्षेत्रातील पाच दिवसांच्या श्री गणेश मूर्तींचे काल श्रद्धापूर्वक आणि भक्तीमय वातावरणात विसर्जन झाले.

जल प्रदुषण टाळण्यासाठी आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार ६ फुटापेक्षा कमी उंचीच्या श्री गणेश मूर्तींचे विसर्जन कृत्रिम विसर्जन तलावात /कृत्रिम विसर्जन स्थळी करावे, अशा महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी केलेल्या आवाहनानुसार, कल्याण डोंबिवली परिक्षेत्रातील ५ दिवसांच्या श्री गणेश मुर्तीचे विसर्जनासाठी श्री गणेश भक्तांनी व नागरिकांनी महानगरपालिकेने उभारलेल्या कृत्रिम तलावांनाच विसर्जनासाठी प्राधान्यक्रम दर्शविला.श्री गणेश भक्तांना आणि नागरिकांना आपल्या श्री गणेश मूर्ती कृत्रिम तलावात /कृत्रिम विसर्जन स्थळी विसर्जित करण्यासाठी प्रोत्साहन देणे करिता तसेच जनमानसाची याबाबतची मानसिकता दृढ करण्याकरिता कृत्रिम विसर्जन तलावात आपल्या श्री गणेश मूर्ती विसर्जन करणाऱ्या गणेश भक्तांचे,महापालिकेच्या अधिकाऱ्यांमार्फत गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले तसेच काही प्रभागात या गणेश भक्तांना सन्मानपत्र देऊन प्रोत्साहित करण्यात आले.महापालिका क्षेत्रात काल रात्री पर्यंत 7419 शाडु मुर्तीचे आणि 10752 पीओपी मुर्तीचे अशा एकूण 18171 श्री गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले. यासाठी महापालिकेने सर्व प्रभागातील विसर्जन स्थळांवर कृत्रिम विसर्जनासाठी निर्माल्य कलश, अग्निशमन यंत्रणा, वैद्यकीय पथक, डस्टबिन इत्यादी व्यवस्था चोख ठेवली होती.सर्व विसर्जन स्थळी विसर्जन प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार दुर्गाडी, मोठा गाव, कुंभारखान पाडा या महत्त्वांच्या विसर्जन स्थळांवर 10 दिवसांच्या श्री गणेश मुर्तीचे विसर्जन होईपर्यंत, महापालिका अधिकारी वर्गाच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत. विसर्जन स्थळांवर घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत निर्माल्य कलश, डस्टबिन, साफसफाईसाठी मनुष्यबळ देण्यात आले होते. तसेच मोठ्या श्री गणेश मूर्ती साठी फोर क्लिप आणि हायड्रा यांची देखील व्यवस्था करण्यात आली होती.

काल सर्व विसर्जन स्थळी निर्माण झालेले सुमारे 32 टन निर्माल्य मा.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांचा खत प्रकल्प, गणेश मंदिर डोंबिवली येथील खत प्रकल्प तसेच महापालिकेचे बायोगॅस प्रकल्प व खत प्रकल्प येथे पाठविण्यात आले. तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, उपआयुक्त समीर भूमकर यांनी इतर अधिकाऱ्यांसमवेत स्वत: विसर्जन घाटांवर/स्थळांवर जावून विसर्जन प्रक्रियेची पाहणी केली.महापालिकेने यावर्षी प्रथमच प्रभागनिहाय विसर्जन स्थळे गुगल मॅपद्वारा प्रदर्शित केल्यामुळे श्री गणेश भक्तांना आपल्या मूर्तीचे विसर्जन करणे सुलभ आणि सोयीचे झाले. महापालिकेने ठिकठिकाणी केलेल्या कृत्रिम विसर्जन स्थळांच्या व्यवस्थेबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शासनाच्या निर्देशानुसार, उद्या देखील श्री गणेश भक्तांनी/नागरिकांनी ६ फुटापेक्षा कमी उंचीच्या श्री गणेश मूर्तीचे विसर्जन महापालिकेच्या कृत्रिम तलावात करून पर्यावरण रक्षणासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# सहाव्या वेतन आयोगाचा फरक निधी देण्यासाठी स्वतंत्र निधी द्या

## भिवंडी पालिका आयुक्तांची राज्य शासनाकडे मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी(शरद भसाळे) : भिवंडी शहर महानगर पालिकेतील अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी देत असलेल्या सहाव्या वेतन आयोगातील फरकाची रक्कम कर्मचाऱ्यांना देण्यासाठी राज्य शासनाने ५५ कोटी ४० लाख रुपयांचा स्वतंत्र निधी द्यावा अशी मागणी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवां कडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

शासन निर्णयानुसार १० ऑगस्ट २००९ नुसार महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन श्रेणी लागू करण्याचे शासनाने निर्देश दिले होते. त्यानुसार २०११ मधील २७ एप्रिल रोजी महासभेच्या मंजुरीने कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू केली.परंतु या दरम्यानची सहाव्या वेतन आयोगातील फरक रक्कम कर्मचाऱ्यांना मिळालेली नाही.त्यासाठी भारतीय कामगार कर्मचारी महासंघ युनियन व इतर कामगार संघटना आग्रही आहेत.त्यासाठी वेळोवेळी आंदोलन निदर्शने केली गेली आहेत.

यावर लोकप्रतिनिधी व अधिकारी कर्मचारी संघटनांनी पालिका प्रशासनाकडे ही फरक रक्कम देण्यासाठी राज्य शासनाकडून स्वतंत्र निधीची मागणी करावी असे पत्र दिले होते.

त्यावर प्रशासनाच्यावतीने भिवंडी मनपा आयुक्त अनमोल सागर यांनी पालिकेची आर्थिक स्थिती कमकुवत असल्याचे पत्राद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून स्वतंत्र निधी देण्याची मागणी केली आहे.

पालिकेस सद्यस्थितीत शासनाकडून जी एस टी परताव्या पोटी दरमहा ३३ कोटी रुपयांचे अनुदान मिळत आहे.पालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी अंदाजे ३३ कोटी व इतर बांधील खर्चा म्हणून १० कोटी खर्च होत असल्याने एकुण ४३ कोटी खर्च दरमाहा होत आहे.

महापालिकेचे महसुली उत्पन्न कमी प्रमाणात होत असून,दैनंदिन स्वरूपातील खर्चापोटी ती रक्कम खर्च होत आहेत.त्यामुळे पालिकेच्या आर्थिक स्थितीत कार्यरत कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचारी यांना ६ व्या वेतनापोटी फरकाची रक्कम अदा करणे शक्य होत नाही.त्यामुळे यासाठी आवश्यक असलेला ५५ कोटी ४० लाख इतका निधी शासनाकडून उपलब्ध व्हावा अशी मागणी आयुक्तांनी शासनाकडे केली आहे.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट



गुरु नाही नाशिवंत | गुरु सत्य तो अनंत ॥१॥
गुरु शांतिबोध गुंफा | सिद्ध चैतन्याची प्रपा ॥२॥
गुरु प्राणांचाही प्राण | शिष्यालागी आत्मदान ॥३॥
गुरु निराकारा अंग | नि:संगासी नित्यसंग ॥४॥
गुरु सगुण निर्गुण | अमृतेचे देहभान ॥५॥

अर्थात, "श्रीगुरुतत्त्व नाशिवंत तर नाहीच, पण सत्य व अनंत आहे. शांती व बोधाची खाण असणारे सद्गुरुतत्त्व हे नित्यसिद्ध अशा चैतन्याची सतत वाहणारी पाणपोईच आहेत. गुरूच खरे प्राणांनाही संजीवन देणारे मुख्यप्राण आहेत. तेच शिष्यावर कृपा करून त्याला स्वत:चेच दान देऊन टाकतात. निराकार असे परब्रह्मच गुरुरूपाने आकारलेले असून नि:संग असे महात्मेही सतत त्याच तत्त्वाचा संग करीत असतात. गुरूच सगुण व निर्गुण असे उभयरूप असून तेच आता अमृतेचे देहभानही व्यापून उरलेले आहेत."

गुरुमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024